# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०३/१२/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे** {दि.२५/११/०८ ची तहकूब सभा}**(का.प.क्र.१६) इतिवृत्त**

दिनांक **२५/११/२००८ रोजी** तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा **बुधवार** दि. **०३ डिसेंबर २००८** रोजी माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी १२-१० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(म.), उप आयुक्त(प्र.), नगर सचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
२. श्री. संजय रामदास जोशी
३. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
४. श्री. मोहन मेघावाले
५. श्री. रविकांत गवळी
६. श्री.जावेद हसन खान
७. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
८. श्री. सिताराम सुरे
९. श्री. नारायण कुचे

**विषय क्र. १३६ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या सन २००५-२००६ च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मुंबईमध्ये जो अतिरेकी हल्ला झाला त्यात आपले कर्तव्यदक्ष अधिकारी, पोलीस शिपाई शहीद झाले तसेच निष्पाप लोक मारले गेले. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो आणि भारताचे माजी पंतप्रधान व्ही.पी.सींग यांचेही नुकतेच निधन झालेले आहे. या सर्वांना स्थायी समितीच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.संजय जोशी : यास आमचे अनुमोदन आहे.
श्री. सतीश कटकटे

मा.सभापती : माजी पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांचे निधनाबद्दल तसेच मुंबईतील अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेले अधिकारी, कर्मचारी तसेच या हल्ल्यात बळी पडलेले सामान्य नागरीकांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री. संजय जोशी : आपल्याकडे लेखा परिक्षण अहवाल आज मंजुरीसाठी आलेला आहे. प्रशासनाने प्रकरण ९ मधील कलम १०६ काय आहे ते समजावून सांगावे. जेणे करून स्थायी समितीचे लेखापरिक्षण अहवालावर कारवाई करण्या संदर्भात काय अधिकार आहेत याची माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : मुख्य लेखापरिक्षक यांनी खुलासा करावा.

मुख्य लेखापरिक्षक : मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये लेखापरिक्षण केले जाते. विविध विभागाचे, विविध प्रकारच्या खर्चाचे त्याचा अहवाल मा.स्थायी समिती समोर सादर करावा असे अपेक्षीत आहे. मा.स्थायी समितीने त्याच्यावर यथोचित कारवाई करावयाची आहे. सदरच्या अहवालाला मान्यता दिल्यानंतर सर्वसाधारण सभेपुढे जाईल. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करीता शासनाकडे जाईल.

श्री. संजय जोशी : स्थायी समितीला या अहवालावर कारवाई करण्याचे अधिकार आहेत.

मुख्य लेखापरिक्षक : मुख्य लेखापरिक्षक यांनी कलम १०६ अन्वये अहवाल सादर करणे. महापालिकेस येणे असलेल्या रक्कमेच्या वसुलीच्या बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्याय बाबतीत जे महत्वाचे, अयोग्य अथवा नियमबाह्य बाबी कोणत्याही वेळी आढळून येतील त्यासंबंधी स्थायी समितीस अहवाल सादर केला पाहिजे. लेखापरिक्षणाच्या प्रगती बाबत स्थायी समितीकडून जी माहिती मागविण्यात येईल ती माहिती पुरविण्यात आली पाहिजे. स्थायी समितीने, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने स्थायी समितीस सादर केलेला प्रत्येक अहवाल व नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाच्या अभिप्रायाचे प्रत्येक विवरणपत्र किंवा या अधिनियमाने त्यास नेमुन दिलेली कर्तव्ये पार पाडणे व त्याच्याकडे सापविलेल्या अधिकाराचा वापर करणे, या संबंधी जी बाब महानगरपालिकेकडे ठेवण्याविषयी नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक स्थायी समितीस सांगेल अशी कोणतीही बाब अशा अहवालावर किंवा विवरणपत्रावर स्थायी समितीने कोणते आदेश दिले आहे ते नमुद करणाऱ्या अहवालासह महानगरपालिकेपुढे ठेवण्याची व्यवस्था केली पाहीजे.

श्री.संजय जोशी : स्थायी समिती जो निर्णय घेईल किंवा मा.सभापती जे आदेश देतील त्यावर निर्णय होईल.

मा. सभापती : अहवालाचे पृष्ठ क्रमांक ०५ ते ७५ पर्यंत लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय झालेला आहे. पृष्ठ क्र.७६ पासून सुरूवात करू.

श्री. संजय जोशी : जे महत्वाचे विषय आहेत, काही ठिकाणी ॲडव्हान्स पैसे दिलेले आहेत. बील सादर करताना जे लेखापरिक्षण विभागाकडे विवरणपत्रे सादर करावयाचे त्याच्यातील त्रुटी वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. त्यावर प्रशासनाने काय केले.

श्री.रविकांत गवळी : सन २००५-०६ या वार्षिक अहवालामध्ये ज्येष्ठ सदस्यांनी वारंवार मागणी केल्यानंतर हा विषय आहे. शासनाने बंधनकारक केला आहे की, वर्षाला अहवाल सादर करावा असे आदेशीत केले आहे. स्थायी समितीची मान्यता दिल्यानंतर, सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर तो शासनाकडे पाठवावा. तरच शासनाचे अनुदान मिळेल. त्या अनुषंगाने ऑडीट रिपोर्ट स्थायी समितीसमोर आणला. दि.१.७.२००८ ला जी चर्चा झाली, या ऑडीट रिपोर्टवर चार सभा झाल्यात. सदरील पुस्तक प्रशासनाकडेही आहे. स्थायी समितीचा हा अधिकार आहे. प्रत्येक विभागाचा प्रत्येक विषयावर बोलण्याचा. चर्चा करण्याचा, त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे. प्रशासनाने पृष्ठ क्र.०१ ते ७५ पर्यंत काय कारवाई केली आहे. मुख्य लेखापरिक्षक यांनी तसा अहवाल मा.आयुक्तांकडे पाठविला आहे काय? त्यावर काय कारवाई झाली.

मा. सभापती : मुख्य लेखापरिक्षक यांनी खुलासा करावा.

मुख्य लेखापरिक्षक : लेखा विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, जनसंपर्क विभाग अहवालाचे पृष्ठ क्र.५ ते ७५ या विभागांच्या अहवालावर चर्चा केली आहे. लेखा विभागाचे २२ आक्षेप होते. त्यापैकी २० परिच्छेदांचे अनुपालन केलेले आहे. अप्राप्त ०२ परिच्छेदांचे अनुपालन बाकी आहे. त्यापैकी १७ परिच्छेद तपासून वगळलेले आहेत. आरोग्य विभाग २४ आक्षेप होते, २४ आक्षेपांचे अनुपालन प्राप्त झाले. शिक्षण विभागाचे १३ आक्षेप होते, १३ चे अनुपालन प्राप्त झाले होते. ०२ वगळण्यात आले आहेत, ११ प्रलंबीत आहेत. जनसंपर्क विभागाचे ०४ आक्षेप होते, ०२ अनुपालन प्राप्त झाले असून ०२ प्रलंबीत आहेत.

श्री.रविकांत गवळी : प्रलंबीत आक्षेप ९५ होते. एकुण १२७ आक्षेप होते. त्यातून ११७ चे अनुपालन झाले आहे. अप्राप्त १० आक्षेप आहेत. वगळण्यात आलेले ३२ आक्षेप आहेत. आज रोजी ९५ आक्षेप अप्राप्त आहेत. त्या संदर्भात काय कारवाई केली.

श्री. संजय जोशी : नगररचना विभागाचे ०६ आक्षेप आहेत. अनुपालन संख्या शुन्य. प्रलंबीत०६ सदर आक्षेपांची पुर्तता नगर रचना विभाग देवू शकला नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : सदर अहवालावर आपले मत मांडून सजेशन देवू.

श्री.रविकांत गवळी : दि. २६.६.२००७ रोजी विषय क्र. ३४ कायम झालेले आहे. दि.२९.३.२००७ रोजी विषय क्र.४९ अन्वये कायम करण्यात आलेले आहे. त्या संदर्भात विचारणा करत आहे. नगर रचना विभागातील ६ आक्षेपांची प्रशासनाने वारंवार मागणी केलेली आहे काय?

मुख्य लेखापरिक्षक : याबद्दल मुद्दाम एक बैठक आयोजित करून सुचना दिल्या होत्या.

श्री.संजय जोशी : मागील ६ आक्षेपांची पुर्तता नगर रचना विभागाकडून प्राप्त का झाली नाही.

मा. सभापती : सिटी इंजिनियर येईपर्यंत उद्यान विभागाचा खुलासा करण्यात यावा.

| | |
|---|---|
| उद्यान अधिक्षक | : मुदतवाढीचा ३ आक्षेप होते. नकाशे तयार करण्याचे काम होते. |
| श्री. संजय जोशी | : मुदतवाएीचा विषय हा किरकोळ विषय आहे. आपण तसे न करता ज्यांच्याकडे पैसे बाकी, आर्थिक बाबी आहे ते घेवू. |
| मा. सभापती | : मालमत्ता विभागाचा खुलासा करावा. |
| मालमत्ता अधिकारी | : लेख परिक्षण विभागाकडून ३२ आक्षेप प्राप्त झाले होते. त्याची उत्तरे तेव्हाच दिली होती. परंतु असमाधानकारक उत्तरे असल्याचे लेखापरिक्षक यांचे मत होते. तेंव्हा आक्षेप सुधारीत करून वसुल करून पत्र लेखा परिक्षक यांचेकडे पाठविलेले आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : किती अनुपालन अहवाल पाठविले आहेत. |
| मालमत्ता अधिकारी | : आठवडी बाजार, चिकलठाणा, जाफरगेट, माती विकणे यात चौकशी अहवाल झालेला आहे. तत्कालीन मालमत्ता अधिकारी श्री.रामटेके आणि श्री.गिरी यांचे बाबत प्रशासनातर्फे चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अहवालानुसार श्री.गिरी यांचेकडून २२ लाख रूपये वसुल करण्याचे, श्री.रामटेके यांचेकडून ११ लाख रूपये वसुल करण्याचे आदेश प्राप्त झालेले आहेत. |
| मा. सभापती | : २२ लाख व ११ लाख रूपये वसुल झालेले आहेत का? |
| श्री.सतीश कटकटे | : सदरील आदेश कुणी दिले. |
| मालमत्ता अधिकारी | : आस्थापना विभागाकडून आदेश प्राप्त झालेले आहेत. |
| सहा.आयुक्त-१ | : श्री.रामटेके व श्री.गिरी यांच्याकडून वसूल करण्या संदर्भात जे आदेश पारित झालेले आहेत, त्याची दोघांनाही आदेशाची प्रत देण्यात आलेली आहे. श्री.गिरी यांनी या संदर्भात एक अपिल दाखल केलेले आहे. माझ्याकडे जी वसुलीची रक्कम दाखविलेली आहे, माझी बदली डिसेंबर महिन्यात झाली होती आणि त्यानंतरच्या ४ महिन्याचे पैसे सुध्दा माझ्या खाती लावण्यात आलेले आहेत. त्यामुळे ॲक्च्युअल पिरिएड पाहून माझ्या नावावरील जास्तीची रक्कम कमी करण्यात यावी, असे अपील दाखल केलेले आहे. अपील कार्यवाही अंतर्गत असून मा.आयुक्त यांचेकडे संचिका सादर करण्यात आलेली आहे. ते अंतिम झाल्यानंतर दोघांचा ॲक्च्युअल पिरिएड ठरवून कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.सतीश कटकटे | : २००५-२००६ मध्ये सदरील अधिकाऱ्यांना निलंबीत केले, पुन्हा कामावर घेतले. |
| श्री.रविकांत गवळी | : ६ महिन्यात सदरचा विषय स्थायी समिती समोर यावयास पाहिजे होता. ९५ आक्षेप आहेत त्यापैकी किती आक्षेपांची पुर्तता/अनुपालन झाले आहे. |
| मा. सभापती | : सिटी इंजिनियर आलेले आहेत. नगर रचना विभागाबाबत खुलासा सादर करावा. |
| श्री. संजय जोशी | : ऑडीट करताना नगर रचना विभागाचे ६ आक्षेप निघाले आहेत. प्रलंबीत ६ आक्षेपांचे अनुपालन नगर रचना विभाग का देवू शकला नाही. |
| शहर अभियंता | : नगर रचना विभागाचा कार्यभार नुकताच माझेकडे आलेला आहे. श्री.भंडारी यांनी पुर्ण चार्ज दिलेला नाही. तेव्हा या प्रकरणाचा अभ्यास करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. |

श्री.संजय जोशी : २००५-२००६ चा अहवाल सन २००७-२००८ या वर्षात आला. त्यामुळे सगळे सदस्य म्हणुन एक बंधन घालू की, आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत अहवाल स्थायी समिती समोर यायलाच पाहिजे. परंतु तो प्रशासनाने अहवाल तीन चार वर्षापुर्वीचा ठेवला. कुठली गोष्ट सुरूवात होतानाच थांबवली तर त्याचे परिणाम चांगले असतात. मागील अहवाल आर्थिक वर्ष संपल्यानंतर आला असता तर सदरचे घोटाळे झ ाले नसते. यात निष्काळजीपणा जास्त असतो. ॲडव्हान्स घेतल्यानंतर तिकीट, व्हौचर वगैरे जमा करू शकले नाही. सदरील दोष प्रशासनाचा, त्या विभागाचा आहे. प्रशासनाला आदेशीत करावे की, एप्रिल पर्यंत अहवाल स्थायी समिती पुढे सादर केला पाहिजे.

मुख्य लेखापरिक्षक : मागील दोन वर्षापासून मुख्य लेखापरिक्षकाचे पद रिक्त होते. तसेच विभागातील लेखा परिक्षकाचे पद रिक्त आहे. त्यामुळे ते काम पागे पडले होते. तरतुदी नुसार लवकरात लवकर असा शब्द आहे. विहित तीन महिन्यात करावे असे काही दिलेले नाही. मागील वर्षाचे काही विभागांचे लेखा परिक्षण अहवाल करण्याचे प्रलंबित आहे. निश्चितच लेखा परिक्षणाचे काम लवकरात लवकर करण्याचे प्रयत्न केले जातील.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : अहवाल सादर करणे बाबत बंधन घातले पाहिजे. अहवाल उशीरा आल्याने प्रशासनाने दक्षता घ्यायला पाहिजे. आर्थिक मुद्यांबाबत सर्व खात्री करून ०८ ते १५ दिवसांत जमा/वसूल करून घ्यावे. स्थायी समिती आपणांस विनंती करते की, जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कारवाई व्हावी आर्थिक प्रकरणात वसूली करावी व यापुढे असे होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरचा अहवाल स्विकारावा अशी विनंती करतो.

श्री. संजय जोशी : २००५-२००६ व २००६-२००७ दोन वर्षाचे घेवून प्रायोरिटीवर चालू वर्षाचे ऑडीट करून स्थायी समिती समोर ठेवण्यात यावे.

मुख्य लेखापरिक्षक : २००६-०७, २००७-०८ पर्यंतचे अहवाल सादर केले आहे ते पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : जी चर्चा झाली आहे त्यात मंजूर करण्यास हरकत नाही. परंतु आता नगर रचना संदर्भात खुलासा मागितला असता विभागाचे कामाचे हस्तांतरण आताच झाल्यामुळे ०६ प्रकरणाचा अभ्यास झाला नाही. यात स.सदस्य काय चर्चा करणार हा महत्वाचा विषय आहे. लेखा परिक्षणामध्ये दोन भाग केले आहेत. भाग-१ अ) विभाग निहाय लेखा परिक्षण तपशील. १ ते ९ पर्यंत तपशील दिला. भाग-२ ब) विशेष तपासणी/लेखा परिक्षण तपशील. यामध्ये मा.महापौर, मा.सर्वसाधारण सभा, मा.स्थायी समिती सभा, जकात विभाग यांच्यात काही दुरूस्ती सुचविल्या आहेत. प्रत्येक विभागाने आपल्या स्तरावर अनुपालन अहवाल सादर केलेला आहे. काही प्रकरणे गंभीर स्वरूपाची आहेत. चर्चा केली असता ती चार-चार दिवस चर्चा चालेल. प्रशासनाला आदेशीत करावे की, स्थायी समितीत, सर्वसाधारण सभेत अहवाल मंजूर झाल्यानंतर तो शासनाकडे त्वरीत पाठविण्यात यावा व हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री. संजय जोशी : हा अहवाल विक्रीसाठी ठेवता येतो. जे पुस्तकात आहे तेच सांगतो. प्रशासन पारदर्शी आहे हे जनतेला दाखविण्यासाठी पेपरमध्ये जाहिरात देवून लेखापरिक्षण अहवाल ज्या कुठल्या नागरीकांना पाहिजे असेल त्यांना तो मिळू शकेल. शहरातील टॅक्स भरणाऱ्या नागरीकांना माहिती होईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : पत्रकारांसाठी सदर अहवालाची प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.

मा. सभापती : सन २००६-२००८ च्या लेखापरिक्षण अहवालावर लवकरच बैठक लावण्यात येईल.

श्रीमती मोमीन सफीया: गुंठेवारी बाबत ऑडीट करण्यात यावे.

मा. सभापती : सर्व बाबींचे ऑडीट झाले आहे. तसेच गुंठेवारी बाबत सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी व गुंठेवारी बाबत स्पेशल ऑडीट करण्यात यावे. सन २००६-२००७, २००७-२००८ च्या लेखापरिक्षण अहवालावर लवकरात लवकर बैठक लावण्यात यावी. सन २००५-२००६ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल मंजूर करण्यात येवून पुढील कार्यवाहीसाठी सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्याची शिफारस करण्यात येत आहे. मधल्या काळात प्रलंबीत मुद्यांची पुर्तता करण्यात यावी. स.सदस्य श्री.संजस जोशी यांनी सुचविल्यानुसार लोकांना अहवाल उपलब्ध करून देण्यात यावा. लोकांचे काही म्हणणे/आक्षेप असेल त्याची वेगळी सुनावणी घेण्यात यावी.

श्री.संजय जोशी : आपण जे आदेशीत करता त्याची प्रशासनामार्फत ॲक्शन घेतली जाते का?

मा. सभापती : सगळी कार्यवाही प्रशासनाने केलेली आहे. नगर रचना विभागातील बदल्या झालेल्या आहेत. घनकचऱ्याचा ठेका मा.आयुक्तांनी रद्द केलेला आहे.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २००५-२००६ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल मंजूर करण्यात येवून पुढील कार्यवाहीसाठी सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्याची शिफारस करण्यात येत आहे. मधल्या काळात प्रलंबीत मुद्यांची पुर्तता करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद